## अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.३ यांची साक्ष

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** :– भैय्याजी कुंडलिक टोणे
**वय** :– ४२ वर्षे, **धंदा** :– हमाली व शेती,
**राहणार** :– दिघंची, ता. आटपाडी, जि. सांगली.

## सरतपासणी अभियोगपक्षातर्फे – श्रीमती ए. पी. केसकर, विद्यमान सहा. सरकारी वकील यांचेमार्फत

**०१.** माझ्या घरी मी, आई–वडील, पत्नी असे राहतो. माझी शेती दिघंची गावात आहे. मी बबन आटपाडकर यांना ओळखतो. ते माझे मामा आहेत. घटना कधी, कुठे, काय, कशी घडली होती याबद्दल मला माहिती नाही. पोलिसांनी माझ्याकडे चौकशी केली नव्हती. मी आरोपीला ओळखतो. तो आमच्या गावापासून ३ ते ४ कि.मी. अंतरावर राहणारा आहे.

**सदर साक्षीदार अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य करीत नसल्यामुळे विद्यमान सहा. सरकारी वकील यांना तोंडी विनंती वरुन साक्षीदारास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली**

०२. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शेताला लागूनच बबन आटपाडकर यांची शेती आहे. हे म्हणणेखरे आहे की, माझ्या आणि माझ्या मामाच्या शेतामध्ये ज्वारी, ऊस, मका अशी पिके आहेत. हे म्हणणे खरे नाही की, रात्री जेव्हा लाईट असते, तेव्हा आम्ही लाईट सुरू करण्यासाठी शेतात जात असतो. हे म्हणणे खरे नाही की, दि.२९/१०/२०२१ रोजी रात्री मी व माझे वडील शेतात पिकांना पाणी देण्यासाठी गेलो असता आम्हाला आरोपी हा अवैध वाळू उपसा करत असलेला दिसला. हे म्हणणे खरे नाही की, त्या अनुषंगाने दि.०२/११/२०२१ रोजी मी पोलिसांना जबाब दिला होता. आता मला माझ्या बयाणातील पोर्शन मार्क अ वाचून दाखविला. तो मी पोलिसांना सांगितला नव्हता. परंतू पोलिसांनी तो का नमूद केला याचे कारण मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपीला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

नि.फौ.ख.क्र. १२७/२०२२
नि.क्र. **२१**

**उलटतपास आरोपीतर्फे – श्री.सी.व्ही.जाधव विद्यमान वकील यांच्यामार्फत सुरु**

०३. उलटतपास नाकारला.

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,

समक्ष

RAHUL BHALCHANDRA KULKARNI

Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2025.12.09 12:33:12 +0530

दि.०९/१२/२०२५
ठिकाणः आटपाडी.

**(आर. बी. कुलकर्णी)**
सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
आटपाडी